महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

महानगरपालिका आरोग्य सेवा अधीनस्त इस्पितळात मातृ दुग्ध पतपेढी तातडीने सुरु करण्याबाबत

(१) ३९८३७ (१३-५-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगरपालिका आरोग्य सेवा अंतर्गतच्या इस्पितळात वा विवाक्षितपणे महानगरपालिका सामान्य रुग्णालयात, स्वाथ्य उपकेंद्रात तसेच महानगरपालिका आरोग्य सेवा अधीनस्त इस्पितळात मातृ दुग्ध पतपेढी तातडीने सुरु करण्याबाबत तसेच पुरेशा वा अत्याधुनिक सोयी-सुविधा तसेच मानवी दुग्धपेढी संदर्भातील सोयी-सुविधा नसल्याबाबतची बाब मा.मुख्यमंत्री, मंत्री (सार्वजनिक आरोग्य, कुटुंब व वैद्यकीय शिक्षण), राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण व वैद्यकीय शिक्षण), महासंचालक (सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण व वैद्यकीय शिक्षण) तसेच त्यांच्या असलेल्या संबंधित इस्पितळाच्या प्रमुखांकडे महानगरपालिका प्रादेशिक आरोग्य तथा वैद्यकीय शिक्षण अधिकारी यांच्या निदर्शनास सदरची बाब माहे जानेवारी, २०१६ वा त्या सुमारास वैद्यकीय क्षेत्रातील प्रमुख आणि संबंधित इस्पितळांच्या अधिष्ठाता यांच्या निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त बाब (१) च्या अनुषंगाने राज्यातील वैद्यकीय संस्थांचे प्रमुख, लोकप्रतिनिधी यांनी सदरची बाब शासनाच्या आरोग्य तथा वैद्यकीय शिक्षण विभागाकडे लेखी स्वरुपात वा वेळोवेळी झालेल्या सार्वजनिक आरोग्य तथा वैद्यकीय मेळाव्यात नोंदविली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती धडककृती कार्यक्रम आखण्याची कार्यवाही केली वा धडक कृती कार्यक्रम गठीत केला आहे तसेच त्यानुसार कोणती कार्यवाहीची अंमलबजावणी करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) : (१) व (२) महानगरपालिका आरोग्य सेवा अधीनस्त इस्पितळात मातृदुग्ध पतपेढी तातडीने सुरू करण्याबाबत तसेच त्याबाबत पुरेशा वा अत्याधुनिक सोयी-सुविधा नसल्याबाबतची बाब निदर्शनास आल्याचे महानगरपालिकांकडून प्राप्त अहवालानुसार दिसून येत नाही.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या लोकमान्य टिळक व रा.ए.स्मा. रूग्णालयात मातृदुग्ध पतपेढी कार्यरत आहे. तसेच राजावाडी रूग्णालय, घाटकोपर व डॉ.बाबासाहेब आंबेडकर रूग्णालय, कांदिवली येथे मातृदुग्घ पतपेढी कार्यान्वित करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महानगरपालिका आरोग्य सेवा अधीनस्त इस्पितळात क्षयरोगापासून बचाव करण्याकरिता पुरेशा वा अत्याधुनिक सोयी-सुविधा नसल्याबाबत

(२) ३९८४१ (१७-५-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय आरोग्य सेवा तसेच महानगरपालिका आरोग्य सेवा अंतर्गतच्या इस्पितळात वा विवाक्षितपणे महानगरपालिका सामान्य रुग्णालयात, स्वाथ्य उपकेंद्रात तसेच महानगरपालिका आरोग्य सेवा अधीनस्त इस्पितळात क्षयरोगापासून बचाव करण्याकरिता पुरेशा वा अत्याधुनिक सोयी-सुविधा तसेच क्षयरोगासारख्या रोगांवरील औषधोपचाराच्या सोयी-सुविधा नसल्याबाबद्ची बाब मा.मुख्यमंत्री, मंत्री (सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण), राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण), महासंचालक (सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण) तसेच संबंधित महानगरपालिका प्रादेशिक आरोग्य वैद्यकीय शिक्षण अधिकारी यांच्या निदर्शनास सदरची बाब माहे जानेवारी २०१६ वा त्या सुमारास वैद्यकीय क्षेत्रातील प्रमुखांनी आणि संबंधित इस्पितळांच्या अधिष्ठाता यांच्या निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त बाब (१) च्या अनुषंगाने राज्यातील वैद्यकीय संस्थांचे प्रमुख, जनप्रतिनिधी यांनी सदरची बाब शासनाच्या आरोग्य तथा वैद्यकीय शिक्षण विभागाकडे लेखी स्वरुपात वा वेळोवेळी झालेल्या सार्वजनिक आरोग्य तथा वैद्यकीय मेळाव्यात नोंदविली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बाबतीत शासनाने कोणती धडककृती कार्यक्रम आखण्याची कार्यवाही केली वा धडक कृती कार्यक्रम गठीत केला आहे तसेच त्यानुसार कोणती कार्यवाहीची अंमलबजावणी करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) : (१) व (२) महानगरपालिका आरोग्य सेवा व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधीनस्त इस्पितळात क्षयरोगापासून बचाव करण्याकरिता पुरेशा वा अत्याधुनिक सोयी-सुविधा तसेच क्षयरोगांवरील औषधोपचाराच्या सोयी-सुविधा नसल्याबाबतची बाब निदर्शनास आल्याचे महानगरपालिकांकडून व सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्राप्त अहवालानुसार दिसून येत नाही.

(३) तथापि, सार्वजनिक आरोग्य विभाग व महानगरपालिकेच्या अधीनस्त दवाखान्यामधून सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत क्षयरोगी रूग्णांचे सर्व्हेक्षण,निदान, मोफत औषधोपचार व समुपदेशन करण्यात येते. मुंबई शहरातील गोवंडीसारख्या अतिप्रार्दूभाव असणाऱ्या क्षेत्रात औषध प्रतिरोधी क्षयरुग्णांसाठी विशेष कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

बृन्हमुंबई महानगरपालिकेमार्फत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

• क्षयरोग व औषध प्रतिरोधी क्षयरोगाच्या त्वरीत निदानासाठी व औषधोपचारासाठी ५७ क्षयरोग चिकित्सालय, १३४ सुक्ष्मदर्शी केंद्रे, ९ डी.आर. टी. बी. उपचार केंद्रे, ९३२ कम्यूनिटी डॉट प्रोव्हायडर्सद्वारे मोफत निदान व औषधोपचार करण्यात येतात.

• प्रभावी उपचाराकरीता औषध प्रतिरोधी क्षयरुग्णांकरीता ८ डी.आर. टी.बी. उपचार केंद्रे कार्यरत आहे व समुपदेशक नेमण्यात आलेले आहेत. बेडाक्युलीन हे नवीन औषध हे अटीसाक्षेप कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करण्यात आले आहे.

• एम.एस.एफ. या अशासकीय संस्थेच्या समन्वयाने औषध प्रतिरोधी क्षयरुग्णांकरीता विशेष कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

• १२ अतिसंवेदनशील विभागामध्ये घर भेटीद्वारे सर्व्हेक्षण करण्यात येते.

क्षयरोग संदेशाची भितीपत्रके व माहिती पत्रके प्रदर्शीत करण्यासाठी औषध विक्रेता संघटनांच्या सहभागाकरीता कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

नांदेड महानगरपालिकेने बी.एस. यु.पी योजनेअंतर्गत कामे करण्यासाठी पंधे या कंपनीस दिलेली कामे अपूर्ण असल्याबाबत

(३) ४३९८७ (०७-०५-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड महानगरपालिकेने बी.एस. यु.पी. योजनेअंतर्गत कामे करण्यासाठी पंधे या कंपनीस दिलेल्या मोबीलायझेशन अडव्हासनच्या निधीतून अद्यापी कामे करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) "असल्यास, उक्त रक्कमेवर सर्वसाधारण सभेच्या ठरावाद्वारे व्याजदर आकारावा अशी शिफारस आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीकडून सदरचा निधी वसुल करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१७) : (१) हे खरे आहे.

बी.एस.यु.पी. प्रकल्पाची जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत न होऊ शकल्यामुळे, तसेच केंद्र शासनाने हा प्रकल्प रद्द केल्यामुळे या योजनेअंतर्गत कंत्राटदारास दिलेल्या मोबीलायझेशन ॲडव्हान्स निधीतून कामे सुरु होऊ शकली नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३) या प्रकरणात एन.टी.सी. मील प्रकल्पाला दिलेला संपूर्ण मोबीलायझेशन ॲडव्हान्स हा कंत्राटदाराच्या संमतीने मे.पंधे इंन्फ्राकॉन्सच्या इतर बीएसयुपी कामाच्या देयकातुन वसुल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील १३८२ पोलिसांविरुध्द चालविलेल्या खटल्यात फक्त एकच पोलीस दोषी ठरल्याबाबत

(४) ५५८९१ (२४-०८-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्टेट क्राइम रेकॉर्ड ब्युरो (एससीआरबी) आणि नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (एनसीआरबी) ने जाहिर केलेल्या गत तीन वर्षाच्या आकडेवारीनुसार संपूर्ण राज्यातील १३८२ पोलिसांविरुध्द खटले चालविले गेले असून त्यापैकी मात्र एकच पोलीस दोषी ठरला असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्तव्यावर असताना पोलिस कर्मचा-यांवर गुन्हा दाखल करताना सबळ पुरावे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१७) : (१) हे खरे नाही.

गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्या क्राईम इन महाराष्ट्र या अहवालावरुन सन २०१३ ते २०१५ या तीन वर्षात पोलीसांविरुध्द दाखल गुन्हयांबाबतची सांख्यिकी माहिती खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

वर्ष	दाखल केसेस	दोष सिध्द होवून शिक्षा झालेले पोलीस कर्मचारी
२०१३	४४२	७
२०१४	४८७	३
२०१५	५३६	५
एकूण	१४६५	१५

सन २०१३-२०१५ या कालावधीत एकूण १४६५ केसेस दाखल झालेल्या असून त्यापैकी १५ प्रकरणात पोलीसांविरुध्द दोष सिध्द होवून त्यांना शिक्षा झालेली आहे.

(२) कर्तव्यावर असताना पोलीस कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करतांना पोलासांनी दिलेल्या सबळ पुराव्यामुळे उपरोक्त पोलीसांविरुध्द गुन्हे सिध्द झालेले आहेत.

ज्या पोलीसांविरुध्द न्यायालयात केसेस सुटलेल्या आहेत त्याबाबतच्या कारणांचा अभ्यास करुन सबळ पुरावे देऊन न्यायालयात केसेस सिध्द करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरातील रस्ते, उड्डाणपूल यावरुन भरधाव वेगाने वाहने चालविल्यामुळे होणारे अपघात

(५) ६५२५२ (१७-०१-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील रस्ते, उड्डाण पूलावरुन भरधाव वेगाने वाहने चालविल्यामुळे झालेल्या अपघातात माहे ऑगस्ट, २०१६ अखेरपर्यंत २६४ जणांचा मृत्यु तर १७२९ जखमी झाल्याची नोंद शहरातील पोलीस स्थानकात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपघातात फ्रीवेवरील अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्याने वाहतूकीच्या नियमांचे पालन व वेगावरील नियंत्रण यासाठी वाहतूक पोलीसांच्या चौक्या उभारण्यात याव्यात अशी मागणी अपघातग्रस्त कुटुंबियांनी मा.गृहमंत्री, मुंबई पोलीस आयुक्त, राज्याचे पोलीस महासंचालक यांच्याकडे सन २०१५ पासून वारंवार विनंती अर्जाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्यावरील वाहन अपघातांच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवण्यासाठी मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१७) : (१) होय हे खरे आहे.

मुंबई शहरातील रस्ते उड्डाण पुलावर माहे जानेवारी ते ऑगस्ट २०१६ मध्ये झालेल्या अपघाताची माहिती खालील प्रमाणे आहे :-

प्राणांतीक अपघात		गंभीर अपघात		किरकोळ अपघात		एकूण अपघात
अपघात	मयत	अपघात	जखमी	अपघात	जखमी	
३२२	३३८	११४३	१६६७	४५०	६३१	२११५

फ्री वे वरील माहे जानेवारी ते ऑगस्ट २०१६ मध्ये झालेल्या अपघाताची माहिती खालील प्रमाणे आहे :-

प्राणांतीक अपघात		गंभीर अपघात		किरकोळ अपघात		एकूण अपघात
अपघात	मयत	अपघात	जखमी	अपघात	जखमी	
४	४	४	४	३	३	११

(२) हे खरे नाही.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, तसेच मा.राज्यमंत्री, गृह (शहरे) यांच्याकडे तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचे आढळुन आले नाही.

तथापि, वडाळा वाहतूक विभागाच्या अंतर्गत मुक्त मार्गावर वाहतूक सुरळीत करण्याकरीता व होणा-या अपघातातील अपघातग्रस्तांना मदत करण्याकरीता वडाळा रॅम्प दक्षिण वाहिनीवर एक पोलीस चौकी उभारण्यात आलेली असून दर्शनी भागावर इलेक्ट्रॉनीक सुचना फलक लावण्यात आलेले आहेत. त्याशिवाय ठिकठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवण्यात आले असुन त्याद्वारे वाहतूक वेगावर नियंत्रण करण्यात येते.

(३) रस्त्यावरील वाहन अपघाताच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवण्याकरीता खालील प्रमाणे उपाय योजना करण्यात आलेलल्या आहेत.

१) रस्त्यावर अपघात होऊ नये म्हणून रस्त्यावर सिग्नल यंत्रणा बसविण्यात आलेली आहे.

२) झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे मारण्यात आलेले आहे.

३) स्टॉप लाईनचे पट्टे मारण्यात आले आहेत.

४) वाहन चालविताना वाहन चालकांना वाहतूकीच्या नियमांची माहिती होण्याकरीता नियमांचे फलक तसेच दिशादर्शक फलक वेगवेगळया ठिकाणी दर्शनी भागावर लावण्यात आले आहेत.

५) रस्त्यावर अपघात होऊ नये म्हणून वाहतूकीच्या वर्दळीनुसार व रस्त्यांच्या परिस्थीतीनुसार वेगवेगळया ठिकाणी गतिरोधक बसविण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील संवेदनशील खटल्यातील साक्षीदारास संरक्षण देण्याबाबत

(६) ६७०९० (११-१-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संवेदनशील खटल्यासह अन्य फौजदारी खटल्यातील तसेच २६/११ च्या अतिरेकी हल्ला अथवा बॉम्बस्फोट, हिट ॲड रन आरोपीच्या विरोधात शासनाला सहकार्य करण्यासाठी, सिध्दापराध वाढविण्यासाठी साक्ष देणाऱ्या साक्षीदारांना सरंक्षण तसेच सोईसुविधा पुरविण्याच्या संबंधात शासनामार्फत दिनांक २२ जानेवारी, २०१५ तसेच १२ मे, २०१५ रोजी निर्णय काढण्यात येऊनही अद्यापही त्याबाबतचा मसुदा तयार करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मसुदाच तयार नसल्याने साक्षीदारांच्या जीवीतास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने साक्षीदारांच्या संरक्षणाच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०१७) : (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, फौजदारी तसेच गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यांमधील साक्षीदारांना धमकी आल्यास अथवा त्यांच्या जीवीतास धोका निर्माण झाल्यास त्यांना सरंक्षण पुरविण्याकरीता शासन निर्णय क्र. सीआरटी-२०१२/प्र.क्र. ६९६/पोल-११, दि. २७.२.२०१३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. तसेच, सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्र. ५७ - महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व सुरक्षा विधेयक, २०१७ हे विधेयक पावसाळी अधिवेशनामध्ये विधानसभा सभागृहामध्ये संमत झालेले आहे.

(३) बॉम्बस्फोटासारख्या संवेदनशिल गुन्ह्यातील महत्वाचे साक्षीदार यांना न्यायालयाने दिलेल्या आदेशावरुन संरक्षण दिलेले आहे. त्याचप्रमाणे कायद्यातील तरतुदीनुसार न्यायालयाचे आदेश प्राप्त करुन साक्षीदारांची नावे व पत्ते गोपनीय ठेवली जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वारजे-कर्वेनगर ते वारजे उड्डाणपुलाचे काम चार वर्षं होऊनही संथ गतीने सुरु असल्याबाबत

(७) ७३९४२ (२०-०४-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील वारजे-कर्वेनगर ते वारजे उड्डाणपुलाचे काम चार वर्षं होऊन मुदत संपली असुनही संथगतीने चालू असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलाच्या कामासाठी १५ महिन्यांची मुदत असताना प्रत्यक्षात ४८ महिने उलटूनही काम अद्याप पूर्ण झाले नसून कामाची गती पाहता, पूल सुरू होण्यास आणखी दोन वर्षे लागतील असे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाच्या ठेकेदारास वारंवार दिल्या जाणाऱ्या मुदतवाढीच्या अनुषंगाने शासनाच्या तिजोरीवर अतिरिक्त भार पडत असल्याने व तेथून प्रवास करणाऱ्यांच्या होणाऱ्या गैरसोयीबाबत ठेकेदारावर नाममात्र दंड आकारणी व्यतिरिक्त कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१७) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

या कामासाठी दिनांक २२/१०/२०१२ रोजी कार्यादेश देणेत आले असून सदर कामासाठी ३० महिन्यांची मुदत होती. कार्यादेशानुसार सदरचे काम एप्रिल २०१५ अखेर पूर्ण होणे अपेक्षित होते. सद्यस्थितीत ८७% काम पूर्ण झाले असून डिसेंबर २०१७ अखेर पूलाचे काम पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(३) ठेकेदारावर टेंडर अटी व शर्तीनुसार दिनांक १५/६/२०१५ पासून रुपये ६,०००/- प्रतिदिन व दिनांक ०१/०६/२०१७ पासून दंडाचे रकमेत वाढ करुन रु. १०,०००/- प्रतिदिन याप्रमाणे दंड आकारणेत येत आहे. दिनांक ३१/०७/२०१७ अखेरपर्यंत रुपये ४९.०६ लक्ष इतका दंड वसूल

करणेत आलेला असून यापुढेही दंड आकारणेत येणार आहे. तसेच या दंडात्मक कारवाई व्यतिरिक्त दिनांक १५/०६/२०१५ पासून भाववाढ सूत्राचे निर्देशांक गोठविणेत आलेला असल्याने मुदतवाढीच्या कालावधीमध्ये होणाऱ्या कामासाठी भाववाढ सूत्रानुसार अतिरक्त रक्कम ठेकेदार यांना अदा केली जात नाही. त्यामुळे शासनाचे तिजोरीवर अतिरिक्त भार पडत नाही.

(४) जागेवरील विद्युत केबल स्थलांतरीत करणे, पाणीपुरवठ्याच्या लाईन स्थलांतरीत करणे तसेच निविदा अटी व शर्तीप्रमाणे कामाची गती ठेकेदाराने न राखल्यामुळे काम पूर्ण होणेस विलंब झालेला आहे.

उंटवाडी रोड (जि.नाशिक) येथील मुलांच्या निरीक्षण गृहातून १५ वर्षीय मुलाचे अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याबाबत

(८) ७४६६० (२०-०४-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंटवाडी रोड (जि.नाशिक) येथील मुलांच्या निरीक्षण गृहातून शाळेत जाणा-या एका १५ वर्षीय मुलाचे अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याची घटना घडली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने तपास करुन अपहरण केलेल्या मुलाचा शोध लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

सदर प्रकरणी मुंबई नाका पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे गु. र. नं. १०/२०१७ भा.दं.वि. कलम ३६३ प्रमाणे अज्ञात आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर मुलाचा शोध घेण्यासाठी पोलीस आयुक्तालय नाशिक शहर व नाशिक ग्रामीण हद्दीतील सर्व पोलीस स्टेशनला मुलाच्या फोटोसह तपास याद्या पाठवून साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. सदर मुलगा कल्याण रेल्वे स्टेशन येथे असल्याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी पोलीस पथक पाठवून शोध घेण्यात आला परंतु त्या ठिकाणी मुलगा मिळून आला नाही. लोहमार्ग पोलीस स्टेशन, कल्याण/ठाणे यांना सदर मुलाच्या फोटोसह तपास यादी देवून सदर मुलाचा शोध घेण्याकामी सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, सदर मुलाचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र तपास पथक नेमण्यात आले असुन कसोसीने शोध घेणे सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

कुर्ला (मुंबई) कपाडियानगर येथील झोपडपट्टीस लागलेली आग

(९) ७४८७९ (२१-०४-२०१७). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला (मुंबई) मधील कपाडियानगर येथील झोपडपट्टीस आग लागून ८ झोपड्या जळाल्याची घटना घडल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार सदर आगीत झोपड्या जळून बेघर झालेल्या झोपडीधारकांना तात्पुरती आर्थिक मदत व पुनर्वसन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०१७) :(१) कुर्ला येथील कपाडियानगर झोपडपट्टीस दिनांक ७ जानेवारी, २०१७ रोजी लागलेल्या आगीत ४ बैठ्या शेडचे नुकसान झाले होते ही वस्तुस्थिती आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडून सदर आगीची चौकशी केली असता, सदर आग "सदोष विद्युत प्रणाली" मुळे लागली असल्याचे आढळून आले.

तथापि, सदर घटना ही नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत नसल्याने, त्यांना कोणत्याही प्रकारची मदत देय होत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य शहरी रस्त्याबाबत अन्य राज्याच्या तुलनेत मागे असल्याबाबत

(१०) ७६०४० (१२-०४-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र रस्ते निर्मितीत देशात आघाडीवर असला तरी महाराष्ट्र शहरी भागातील रस्त्यांच्या बाबतीत मात्र नवव्यास्थानी असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या रस्त्यांची आकडेवारी सन २०१४-२०१५ या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शहरी भागातील रस्त्याबाबत मागे राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शहरी भागातील रस्त्यांची पुर्तता करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) : (१) केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या २०१३-१४ व २०१४-१५ च्या भारतातील मूलभूत रस्ते सांख्यिकी अहवालानुसार (Basic Road Statistics of India २०१२-१३ and २०१४-१५) शहरी रस्त्यांच्या लांबीमध्ये महाराष्ट्र राज्य नवव्या स्थानी असल्याचे दिसून येते.

(२), (३) व (४) राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना रस्ता अनुदान, महानगरपालिकांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी विशेष अनुदान, हद्दवाढ होणाऱ्या व नवीन नगरपालिकांना अनुदान इत्यादी योजनांतर्गत रस्त्यांच्या कामाकरीता निधी देण्यात येतो.

याव्यतिरिक्त नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत त्यांच्या स्वनिधीतून रस्त्यांची कामे करण्यात येतात.

राज्यभरातील सफाई कामगारांना किमान वेतन देण्याबाबत

(११) ७६४४४ (२१-०४-२०१७). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरातील सफाई कामगारांना किमान वेतन देण्याचे शासनाने दिनांक २४ फेब्रुवारी, २०१६ रोजी मान्य करुनही अद्याप किमान वेतन मिळत नसल्याने सफाई कामगारांनी दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे मोर्चाचे आयोजन करुन धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सफाई कामगारांना किमान वेतन देण्याचे मान्य करुन प्रदिर्घ काळ किमान वेतन थकीत ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासानामार्फत चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तदनुसार राज्य भरातील सफाई कामगारांना मान्य केलेल्या दिनांकापासून किमान वेतन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०१७) : (१) दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी कचरा वाहतूक श्रमिक संघ यांनी कंत्राटी सफाई कामगारांच्या विविध मागण्यांबाबत निषेध कार्यक्रम आझाद मैदान येथे आयोजित केला होता.

(२) व (३) स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत वगळून) या अनुसुचित रोजगार वर्गासाठी किमान वेतन दर पुर्ननिर्धारित करण्याबाबतच्या दिनांक २४ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या अधिसुचनेचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सुचना शासन परिपत्रक दिनांक २२ जानेवारी, २०१६ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना दिल्या आहेत .

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूरच्या श्रीमहालक्ष्मी देवस्थानातील मनकर्णिका कुंडावर बांधण्यात आलेले शौचालय पाडण्याबाबत

(१२) ७७०३० (२१-०४-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेले कोल्हापूर येथील श्री महालक्ष्मी देवस्थानात मनकर्णिका हे पवित्र कुंड आहे; मात्र पुरातत्त्व खात्याची अनुमती न घेता त्यावर अनधिकृतपणे शौचालय बांधण्यात आले असून ते शौचालय पाडण्याचे कोल्हापूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी राजाराम माने यांनी आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशाची अंमलबजावणी होत नाही म्हणून श्रीमहालक्ष्मी देवीचे भक्त आणि हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या वतीने जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन आणि शासन यांच्याकडे सन २०१६ मध्ये तक्रारी करण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुरातत्त्व खात्याची अनुमती न घेता शौचालय बांधण्यासह श्री महालक्ष्मी देवस्थानात एकूण १३ बदल केल्याविषयी दोषींवर कायद्यानुसार शासन गुन्हे दाखल करणार आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी तत्कालीन जिल्हाधिकारी राजाराम माने यांचे असलेले आदेश आणि भक्तांच्या धार्मिक भावनांचा विचार करून शासन उर्वरित अवैध बांधकाम पूर्णपणे जमीनदोस्त करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०४-११-२०१७) : (१) तत्कालीन जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी श्री.महालक्ष्मी देवस्थान परिसरात असलेल्या मनकर्णिका कुंडावर अनधिकृतपणे बांधण्यात आलेले शौचालय पाडण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे.

(२) अशा आशयाच्या तक्रारी जिल्हा पोलीस प्रशासनास प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी कळविल्यानुसार अद्यापी या प्रकरणी कोणताही गुन्हा नोंद करण्यात आलेला नाही.

(४) श्री महालक्ष्मी देवस्थान परिसरातील मनकर्णिका कुंड येथील शौचालयाचे बांधकाम काढून टाकण्याबाबत महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

औढा (जि.हिंगोली) शहरातील ५ हजार कुटूंबाकडे शौचालय नसल्याबाबत

(१३) ७७२४२ (२०-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औढा (जि.हिंगोली) शहरातील १० हजार कुटूंबापैकी ५ हजार कुटूंबांकडे अदयाप शौचालय नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त ५ हजार कुटूंबांकडे शौचालय उपलब्ध होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१७) : (१) व (२) हे खरे नाही.

सन २०११ च्या जनगणनेनुसार औंढा शहरातील कुटुंबांची संख्या २९६० आहे. स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याकरीता केलेल्या सर्वेक्षणानुसार औंढा शहरातील १६०७ कुटुंबांकडे वैयक्तिक घरगुती शौचालय सुविधा उपलब्ध नसल्याचे आढळून आले आहे.

औंढा शहरातील १६०७ कुटुंबांपैकी १५५३ कुटुंबांना वैयक्तिक घरगुती शौचालय बांधकामासाठी निधी वितरीत करण्यात आला असून त्यापैकी ११३३ कुटुंबांनी वैयक्तिक शौचालय बांधकामपूर्ण केले आहे. उर्वरीत शौचालय बांधकाम प्रगती पथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वांद्रे येथील सीटीएस क्र.७९१/अ या सुमारे ३ हेक्टरच्या भूखंडाबाबत

(१४) ७७४३४ (२१-०४-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे येथील सीटीएस क्र.७९१/अ हा सुमारे ३ हेक्टरचा भूखंड असून त्यावर संक्रमण शिबीरामध्ये सुमारे २०० घरे तर अनधिकृत झोपडयामध्ये ४०० हून अधिक रहिवाशी रहात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संक्रमण शिबीरातील रहिवाश्यांना मालकी हक्काने घरे व झोपडपट्टी पुर्नविकास योजनेंतर्गत झोपडीधारकांना घरे देण्यासाठी म्हाडाने दिनांक १३ डिसेंबर, २००४ रोजी निविदाही मागविलेल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनानुषंगाने प्राप्त झालेल्या ८ निविदापैकी ओम मेटल प्रा.लि. यांची संयुक्त भागीदारीतील निविदा म्हाडाने मंजूर केली होती व त्यानुसार विकासकाने १०७ कोटी ४४ लाख रूपयांची रक्कम म्हाडाकडे माहे सप्टेंबर २००५ ते दिनांक ४ ऑक्टोबर, २००७ या कालावधीत भरली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू भूखंडावर पुनर्विकास करण्याच्या दृष्टीने अजूनपर्यंत फारशी प्रगती झालेली नाही आणि काही निर्णयामुळे परिस्थिती बदलल्याने पुनर्विकासाच्या निर्णयात अनेक अडचणी आल्या आहेत, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, सदरहू भूखंड एमएमआरडीएच्या क्षेत्रात असल्याने त्यासाठी त्याच्या नियमानुसार १.८७५ इतका चटई क्षेत्र निर्देशांक लागू होता मात्र हा भूखंड एमएमआरडीए क्षेत्रातून वगळण्यासाठी राजकीय मोर्चेबांधणीसह मंत्रालयीन पातळीवर हालचाली सुरू झाल्याने मुख्यमंत्र्यानी हा भूखंड एमएमआरडीएतून वगळून महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट करण्याचा निर्णय घेवून दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी अधिसुचना जारी करण्यात आली, हे ही खरे आहे काय

(६) असल्यास, सदरहू भूखंडाचा विकास म्हाडामार्फत करण्यात यावा म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली असतानाही सदरहू भूखंडाचा विकास खाजगी बिल्डरांच्या माध्यमातून करण्याबाबत उच्च स्तरावर हालचाली सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, सदरहू भूखंडाचा विकास म्हाडामार्फत न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (२४-११-२०१७) : (१) व (२) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचेकडून प्राप्त अहवालानुसार वांद्रे येथील सीटीएस क्र. ७९१/अ या सुमारे ३ हेक्टरच्या भूखंडावरील संक्रमण शिबिरामध्ये ४०० गाळे असून, अंदाजे ४०० झोपड्या सदर भूखंडावर अस्तित्वात असून सदर भूखंडाच्या पुनर्विकासासाठी व त्या भूखंडावरील संरक्षण पात्र झोपडीधारकांच्या पुनर्वसनाच्या योजनेकरीता सन २००४ मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) वांद्रे रिक्लेमेशन अभिन्यास पूर्वी एम. एम. आर. डी. ए. या नियोजन प्राधिकरणांतर्गत होता. नगर विकास विभागाच्या दि. १८.११.२०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार सदर अभिन्यास मुंबई महानगरपालिका या नियोजन प्राधिकरणांतर्गत समाविष्ट करण्यात आला.

(६) व (७) सदरहू भूखंडावर अतिक्रमणे झालेली असल्यामुळे सन २००४ मध्ये निविदा काढून व सर्वोच्च देकार देणाऱ्या निविदाकाराबरोबर करारनामा करुन भूखंडाचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येत आहे. यामधून म्हाडास संक्रमण शिबिराइतक्या सदनिका झोपडपट्टीवासीयांसाठी सदनिका व उर्वरित विक्री योग्य बांधकामक्षेत्रासाठी अधिमुल्याची रक्कम प्राप्त होणार आहे. सदर संक्रमण शिबिराच्या भूखंडाच्या पुनर्विकासासाठी सन २००४ मध्ये निविदा काढण्यात आलेल्या असून, तद्नंतर सन-२००६ मध्ये मे. ओम मेटल कन्सोर्टीयम यांचेसोबत करारनामा करण्यात आला आहे.

सुरजागड पहाडीवर (जि.गडचिरोली) लोहखनिज प्रकल्पाचे काम सुरू असताना नक्षलवाद्यांनी वाहनांची जाळपोळ केल्याबाबत

(१५) ७७७०३ (२१-०४-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील, गडचिरोली जिल्ह्यातील, सुरजागड पहाडीवर 'मेक इन इंडिया' अंतर्गत, सुमारे १० वर्षानंतर लोहखनिज प्रकल्पाचे काम सुरू करण्यात येत असताना नक्षलवाद्यांनी ७९ वाहनांची जाळपोळ केल्याची घटना दिनांक २८ डिसेंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, गडचिरोली जिल्ह्यात, मागील ३२ वर्षात एकही मोठा उद्योग उभा राहू न शकल्याने येथील विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेले व प्रलंबित लोहखनिज प्रकल्पाचे काम पुन्हा सुरू करण्याकरिता व सुरक्षेच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७) : (१) होय, हे खरे आहे तथापि, एकूण ८१ वाहनांची जाळपोळ करण्यात आली आहे.

(२) होय, सदर घटनेबाबत पोलीस स्टेशन एटापल्ली येथे अप. क्र. ०३५/२०१६,कलम ३०७, ३४१, ३४२, ४३५, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४८, १४९, १२०(ब) भादंवि, ५/२८ भाहका, १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, २०१६ व १८,२०,२३, यु. ए. पी. ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद दाखल करण्यात आला असून आतापर्यंत गुन्हातील ५ नक्षल आरोपींना अटक करण्यात आले आहे. व अन्य आरोपींना पकडण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) गडचिरोली जिल्हयातील एटापल्ली तालूक्यातील सुरजागड लोहखदान प्रकल्पाचे काम लॉयड मेटल ॲन्ड एनर्जी लिमिटेड या कंपनीद्वारे सुरु असून नक्षलवाद्यांनी तेथील वाहनांची जाळपोळ केल्यानंतर या प्रलंबित प्रकल्पाचे काम सुरु करण्याच्या संदर्भात मा. मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे दि.२८.१२.२०१६ रोजी बैठक घेण्यात आली. त्यानुसार सुरजागड येथील खदान व प्रकल्प परिसरात सुरक्षा व्यवस्थेसाठी नविन २ पोलीस मदत केंद्र (AOP) उघडण्यात आली आहेत. अत्याधुनिक साधन सामुग्री, सज्जित सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आली आहे. वाहतूकीसाठी पक्के रस्ते, विद्युत पुरवठा व सुरक्षाच्या दृष्टीने अन्य कामे सुरु आहेत. विशेष अभियान पथक व स्थानिक पोलीस दल दररोज रोड ओपनिंग बंदोबस्त करत आहेत. ५ नविन पोलीस दुरक्षेत्राचे बांधकाम करण्याची परवानगी देण्यात आली आहे. बस्तरीया बटालियनच्या धर्तीवर ३०० पोलीस शिपाई भरती करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. वाहतूक परिसरात २ पोलीस दुरक्षेत्र स्थापन करण्यात आले आहेत. लोह खनीजाच्या कामास पावसाळयानंतर दि.०३.०९.२०१७ पासून सुरुवात झाली आहे त्यास पोलीस मदत केंद्र हेडरी येथून संरक्षण देण्यात आले आहे. तसेच सुरक्षेसाठी विशेष अभियान पथकातील एक पार्टी नेहमी राखीव ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर मध्यवर्ती बस स्थानकात गर्दीचा फायदा घेवून चोरीचे प्रकार घडत असल्याबाबत

(१६) ७७७८० (२१-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर मध्यवर्ती बस स्थानकात गर्दीचा फायदा घेवून चोरीचे अनेक प्रकार घडत असून रात्रीच्या वेळी अनेक तरुणांचे गट मद्यप्राशन करून मोटारसायकल वरून दंगा करित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्थानकात सुरक्षेचा अभाव असल्यामुळे प्रवाशात घबराहटीचे वातावरण पसरले असून सदर मध्यवर्ती बस स्थानकातील चोरीचे प्रकार रोखण्यासाठी शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१७) : (१) व (२) कोल्हापूर मध्यवर्ती बस स्थानकात गर्दीचा फायदा घेवून चोरीचे प्रकार घडलेले असुन त्याबाबत शाहुपुरी पोलीस स्टेशन येथे ४ गुन्हे दाखल आहेत. परंतु रात्रीच्या वेळी अनेक तरुणाचे गट मद्यप्राशन करुन मोटारसायकलवर दंगा करीत असल्याचे निदर्शनास आले नाही किंवा तशी कोणतीही तक्रार पोलीस स्टेशनला दाखल नाही.

पोलीस स्टेशन शाहुपुरी, कोल्हापूर येथे दाखल ४ गुन्हे खालीलप्रमाणे आहेत.

१) गु.रं.नं.२८/२०१७ भा.दं.वि. कलम ३७९

२) गु.रं.नं.३९/२०१७ भा.दं.वि. कलम ३७९

३) गु.रं.नं.९५/२०१७ भा.दं.वि. कलम ३७९

४) गु.रं.नं.१४१/२०१७ भा.दं.वि. कलम ३७९

उक्त गुन्ह्यांपैकी गु.र.नं.२८/२०१७ हा गुन्हा उघडकीस आला असून यामध्ये २ महिला आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच, उर्वरित गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न करणे व चोरीला गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यावर सदर गुन्हे पोलीस तपासावर आहेत.

(३) विलंब झालेला नाही

धुळे शहराचा "रिजनल डेव्हलपमेंट प्लॅन " करण्याबाबतचा प्रस्ताव

(१७) ७८५५७ (२१-०४-२०१७). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहराचा "रिजनल डेव्हलपमेंट प्लॅन " करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक १८ जानेवारी,२०१७ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांकडे पत्राद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१७) : (१), (२) व (३) होय.
प्रादेशिक योजना धुळेच्या अनुषंगाने शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ३ चे उपकलम १ अन्वये दि.१४.०७.२०१६ रोजीच्या अधिसुचनान्वये धुळे प्रदेशाची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर प्रादेशिक योजना प्रसिध्द करण्यात आली असुन मंजुरीची पुढील कार्यवाही अधिनियमातील तरतुदीनुसार प्रगती पथावर आहे.
(४) लागू नाही.

बुलढाणा शहरातील तहसील कार्यालय ते सर्क्यूलर रोड पर्यंतच्या रस्त्याच्या कामाबाबत

(१८) ८००३८ (२१-०४-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा शहरातील तहसील कार्यालय ते सर्क्यूलर रोड पर्यंतच्या रस्त्यावर लहान मुलांचे ज्ञानपीठ, शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची सततची वर्दळ असून हा रस्ता खड्डेमय झाल्याने रहदारीस अयोग्य असल्या कारणाने शालेय विद्यार्थ्यांच्या अपघातामध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा शहरात उपरोक्त मुख्य रस्त्यावर शालेय विद्यार्थ्यांचे वाढते अपघात रोखण्यासाठी सदर रस्ता दुभाजकासह, नुतनीकरण व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०१७) : (१) हे खरे आहे,
सदर रस्ता शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असून रस्त्यावर सततची वर्दळ असते. सन २०१५ ते आतापर्यंत एकूण ११ अपघात होऊन ५ व्यक्तींचा मृत्यू झाल्याची नोंद आहे.
(२) बुलढाणा शहरातील रस्ते विकास कामासाठी विशेष रस्ता अनुदान योजनेअंतर्गत रू. १००.०० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सद्यस्थितीत रस्त्याच्या कामाची निविदा प्रक्रिया प्रगती पथावर असून कंत्राटदारासोबत करारनामा झाल्यानंतर काम सुरू करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्हयातील पेनटाकळी प्रकल्पावरून चिखलीला पाणी पुरवठा करणा-या पाईपलाईनवरील अनेक व्हॉल्व्हमधून पाण्याची गळती होत असल्याबाबत

(१९) ८१४३३ (०६-०५-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील पेनटाकळी प्रकल्पावरून चिखलीला पाणी पुरवठा करणाऱ्या पाईपलाईनवरील अनेक व्हॉल्व्हमधून पाण्याची गळती होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त गळती रोखण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०१७) : (१) हे खरे आहे.
(२) मौजे लव्हाळा व उमरेड या गावाजवळ काही अज्ञात लोकांडून रात्रीच्या वेळी बेकायदेशीररित्या एअर व्हॉल्व फोडण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात संशयित शेतकऱ्यांना नोटीसा देऊन तंबी देण्यात आलेली आहे. तसेच उक्त प्रकरणी चौकशी करण्याबाबत चिखली पोलिस स्टेशला कळविण्यात आले आहे व व्हॉल्वला छेडखानी करू नये याबाबत वर्तमान पत्राद्वारे आवाहन करण्यात आले आहे. सदर गळती असलेल्या व्हॉल्वची दुरूस्ती करण्यात आली असून गळती बऱ्याच प्रमाणात बंद करण्यात आली आहे. तसेच गळती कायमस्वरूपी बंद करून त्यास संरक्षित करण्याकरिता पाणी टंचाई निधी अंतर्गत DPR (Detail Project Report) तयार करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

शेंदूरजना घाट नगरपरिषद (जि.अमरावती) येथील रोजंदारी कर्मचा-यांना सेवेत नियमित करण्याबाबत

(२०) ८२९८९ (२०-०४-२०१७). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेंदूरजना घाट नगरपरिषदेतील (जि.अमरावती) रोजंदारी कर्मचा-यांना सेवेत नियमित करण्यात यावे अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या निर्णयानुसार कर्मचा-यांना सेवेत नियमित करणे शक्य असतानाही या कर्मचा-यांना नियमित करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) शेंदुरजनाघाट नगर परिषदमध्ये ८ कर्मचारी रोजंदारी तत्वावर कार्यरत असून ते दि.१०.०३.१९९३ नंतरचे आहेत. शासनाच्या धोरणानुसार सन १९९३ नंतर नगरपरिषद सेवेत रोजंदारी तत्वावर घेतलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयातील नव्याने निर्माण झालेल्या कुडाळ, वाभवे-वैभववाडी, देवगड आदी नगरपरिषदांना आवश्यक असलेल्या विविध सवंर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजूरी मिळण्याबाबत

(२१) ८४८५७ (२३-०८-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील नव्याने निर्माण झालेल्या कुडाळ, वाभवे-वैभववाडी, देवगड आदी नगरपरिषदांची निमिर्ती होवून आजमितीस सुमारे १ वर्षाहून अधिक कालावधी झाला असतानाही सदरहू नगरपरिषदांना आवश्यक असलेल्या विविध सवंर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदांची मंजूरी व त्यानुषंगाने पदावर नियुक्त्या आजमितीस झालेल्या नाहीत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू नगरपरिषदांनी कर्मचाऱ्यांअभावी नगरपरिषदांचे कामकाज करताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने विनाविलंब कर्मचाऱ्यांच्या पदांची निर्मिती व मंजूरी लवकारात लवकर व्हावी यासाठी सदरहू नगरपरिषदांनी मागील १ वर्षापासून सातत्याने शासनाकडे प्रस्तावाद्वारे मागणी केलेली आहे, हेही खरे आहे काय

(३) असल्यास, मागणी करूनही अद्यापी सदरहू नगरपरिषदांतील कर्मचाऱ्यांच्या पदांची निर्मिती व मंजूरी देण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास,सदरहू नगरपरिषदांमार्फत नगरपरिषद हद्दीतील नागरीकांना चांगल्या नागरी सोयी-सुविधा मिळण्याच्या दृष्टीने तसेच नगरपरिषदांचे कामकाज सुरळीत व चांगल्याप्रकारे चालण्याच्या दृष्टीने विनाविलंब कर्मचाऱ्यांच्या पदांची निर्मिती व मंजूरी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१७) : (१) व (२) शासनाच्या दि.०५.०७.२०१६ च्या शासन निर्णयान्वये १०१ नवनिर्मित नगरपरिषद/नगरपंचायतीचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार नवनिर्मित नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या कर्मचाऱ्यांच्या समावेशनाचे अधिकार विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांना संचालनालयाच्या दि.०७.०२.२०१७ च्या आदेशान्वये प्रदान करण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने, नवनिर्मित नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या कर्मचाऱ्यांच्या समावेशनाबाबत विभागीय आयुक्त स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

वरळी (मुंबई) येथील फोर सिझन हॉटेलच्या मालकांनी केलेले अनधिकृत व बेकायदेशीर बांधकाम निष्कासित करण्याबाबत

(२२) ८४८६७ (२३-०८-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) येथील फोर सिझन हॉटेलच्या मालकांनी बेसमेंट एरिया तसेच ११ व २५ व्या मजल्यावरील रिफ्युझ एरिया व अन्यत्र महानगरपालिकेची परवानगी न घेता बेकायदेशीर व अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी मा.मुख्यमंत्री, आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक महानगरपालिका आयुक्त जी/साऊथ वार्ड आदींकडे मागील २ वर्षापासून सातत्याने नागरीकांनी तसेच माहिती अधिकारी कार्यकर्तांनी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फोर सिझन हॉटेलमध्ये मालकांने केलेले सर्व अनधिकृत व बेकायदेशीर बांधकाम विनाविलंब निष्कासित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१७) : (१) वरळी येथील फोर सिझन हॉटेलच्या ११ व २५ व्या मजल्यावर व अन्यत्र अनधिकृत बांधकाम झाल्याची तक्रार माहे एप्रिल २०१७ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाली ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) सदर हॉटेलचे मंजूर नकाशे प्राप्त झाल्यावर, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर इमारतीची पाहणी करुन सदर हॉटेलच्या अनधिकृत बांधकामावर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे.
त्याअनुषंगाने महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

मुंबईतील भटक्या कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याबाबत

(२३) ८४९३३ (२३-०८-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील रस्त्यावर मोकाट फिरणाऱ्या भटक्या कुत्र्यांना रोखणे महानगरपलिकेच्या आवाक्यात राहिले नसून भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणासाठी कोट्यवधींचा खर्च करूनही त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भटक्या कुत्र्यांच्या हल्यामुळे जखमी व मृत झालेल्यांचे आकडे वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुत्रे पकडण्याची कामे सोपविलेल्या संस्था आणि त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांचा निर्बीजीकरणाच्या कामावर लक्ष नसल्याने ही गंभीर समस्या निर्माण झाल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१७) :(१) मुंबईतील भटक्या श्वानांची गणना प्रथमत: जानेवारी २०१४ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली आहे.

(२) श्वान दंश व रेबीजमुळे झालेल्या मृत्युबाबत मागील ३ वर्षांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

वर्ष	श्वान दंश	रेबीजमुळे मृत्यू	
		मुंबईतील	मुंबईबाहेरील
२०१४	८१,१६५	०	३
२०१५	७८,६४६	२	३
२०१६	८६,८५९	२	५
जाने. ते जून २०१७	३८,०५६	०	२

(३) हे खरे नाही.

श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत चार अशासकीय संस्था कार्यरत होत्या. माहे नोव्हेंबर २०१६ मध्ये दोन नवीन अशासकीय संस्था नेमण्यात आल्या आहेत.

अशासकीय संस्थांमार्फत करण्यात आलेल्या श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रियेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

वर्ष	श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रियेची संख्या
२०१४	७,२३६
२०१५	६,४१४
२०१६	११,९६७
जानेवारी ते जून २०१७	११,९४०

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील करप्राप्त इमारतींना विशिष्ट ओळख क्रमांक (युआयडी) देण्याबाबत

(२४) ८५११० (२३-०८-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील प्रत्येक करप्राप्त इमारतीशी संबंधित सर्व माहिती एकाच ठिकाणी मिळावी तसेच महानगरपालिकेमध्ये दस्ताऐवज हाताळताना पारदर्शकता आणि गतिमानता यावी म्हणून प्रत्येक इमारतीला विशिष्ट ओळख क्रमांक (युआयडी) देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या करप्राप्त इमारतींना देण्यात येणा-या युआयडी क्रमांकाचे फायदे काय आहेत,

(३) असल्यास, मुंबईमध्ये तब्बल २ लाख २४ हजार इमारती असून यातील किती इमारतींना युआयडी क्रमांक देण्यात आलेला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१७) : (१) हे खरे आहे.

(२) मुंबईतील करप्राप्त इमारतींना युआयडी क्रमांक दिल्यामुळे होणारे फायदे खालीलप्रमाणे आहेत :-

• महानगरपालिकेच्या विविध व्यवहारांची माहिती सुलभरित्या प्राप्त होईल.

• प्रत्येक करप्राप्त इमारतीशी संबंधित सर्व माहिती एकाच क्रमांकाने संदर्भित होईल.

• युआयडी क्रमांक जी.आय.एस. मॅपिंग सोबत जोडण्यात येणार आहेत.

• विविध प्रकारचे परवाने देण्याची कार्यवाही सुलभरित्या होईल.

• ज्या मालमत्ता युआयडी क्रमांक नमूद करणार नाहीत अशा ठिकाणी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करुन अशा मालमत्तांना कराच्या जाळयात आणता येईल.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अभिलेखानुसार सन २०१६-१७ करिता ३,१७,०९७ व सन २०१७-१८ करिता ३,४४,०४७ इतक्या मालमत्ता करनिर्धारीत आहेत.

माहे ऑगस्ट २०१७ पर्यंत २,७७,७४८ मालमत्तांना यु.आय.डी. क्रमांक देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगरपालिकेच्या भूखंडावर विकसकाने कुंपण घालून अतिक्रमण करून तेथील सुमारे २० झाडांची कत्तल केल्याबाबत

(२५) ८५५८७ (२३-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील मित्रमंडळ चौकातील महानगरपालिकेच्या भूखंडावर विकसकाने कुंपण घालून अतिक्रमण करून तेथील सुमारे २० झाडांची कत्तल केल्याची बाब दिनांक ६ जून,२०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मित्रमंडळ चौकातील भूखंडावर अतिक्रमण होत असल्याची तक्रार दिनांक ३१ जानेवारी,२०१७ रोजी करण्यात आल्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ रोजी महानगरपालिका अधिकाऱ्यांनी केलेल्या प्रत्यक्ष पाहणीत अतिक्रमण झाल्याचे व झाडांची कत्तल झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रार प्राप्त असतांना तब्बल चार महिने महानगरपालिका अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळे विकसकाला पाठबळ मिळून त्याने जागेचा बेकायदेशीरपणे ताबा घेतला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनस्तरावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१७) :(१), (२), (३) व (४) मित्रमंडळ चौक येथील अनधिकृत वृक्षतोडीबाबत दि. १/३/२०१७ रोजी वृक्ष प्राधिकरण विभागाकडे तक्रार प्राप्त झालेली आहे. त्यानुसार, दि.३०/३/२०१७ रोजी पाहणी केली असता, अनाधिकृत वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास

आलेले आहे. त्यास अनुसरून संबंधीतांविरूध्द महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ मधील तरतूदीनुसार दि.१.४.२०१७ रोजी नोटीस बजावली होती. तसेच त्यांचेविरूध्द मा.ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट वर्ग-१, पुणे येथे फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

राज्यातील विशेष प्रकल्पांचा दर्जा असलेल्या समृध्दी महामार्ग, मेट्रो, कोस्टल रोड, सिंचन प्रकल्पातील विविध अडथळे दूर करण्यासाठी " विशेष प्रकल्प कायदा " तयार करण्याबाबत

(२६) ८५६०० (२३-०८-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेष प्रकल्पांचा दर्जा असलेल्या समृध्दी महामार्ग, मेट्रो, कोस्टल रोड, सिंचन प्रकल्पातील विविध अडथळे दूर करुन निर्धारित कालावधीत प्रकल्प पूर्ण होण्यासाठी " विशेष प्रकल्प कायदा "तयार करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी नगरविकास विभागास माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरविकास विभागाने याबाबत सर्वंकष अभ्यास करुन "विशेष प्रकल्प कायदा" तयार केला आहे काय,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे वा याबाबतच्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) : (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नवजात बाळांच्या चोरीला आळा घालण्यासाठी महानगरपालिकेच्या रुग्णालयातील २६ पैकी १८ प्रसृतिगृहांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरेच बसविण्यात आले नसल्याबाबत

(२७) ८५६८५ (२३-०८-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवजात बाळांच्या चोरीला आळा घालण्यासाठी महानगरपालिकेच्या रुग्णालयातील २६ पैकी १८ प्रसृतिगृहांमध्ये सीसी टीव्ही कॅमेरेच बसविण्यात आलेले नसल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १,६१२ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत त्यातील बहुतांशी सन २०११ नंतर देखभाल न झाल्याने बंद अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले त्यानुसार उपरोक्त १८ प्रसृतिगृहांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) तसेच, यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर शासन स्तरावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१७) : (१) सन २००९ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व १८ रुग्णालयांमध्ये तसेच ६ प्रसुतीगृहांमध्ये सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले होते ही वस्तुस्थिती आहे.
(२), (३), (४) व (५) महानगरपालिकेच्या १८ रुग्णालये व ६ प्रसुतीगृहांत सन २००९ मध्ये बसविण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही. यंत्रणेच्या दोन वर्षांच्या हमी कालावधीनंतर पाच वर्षांचा परिरक्षण कालावधी सुरु होता. सदर कालावधी माहे ऑक्टोबर, २०१६ रोजी संपुष्टात आला आहे.

सन २०१४-१६ या कालावधीत बसविण्यात आलेल्या ३ प्रसुतीगृहांतील सी.सी.टी.व्ही. यंत्रणांचा परिरक्षण कालावधी अद्याप संपुष्टात आलेला नाही व सदर यंत्रणा सुरु आहे.

सन २०१६ मध्ये के.ई.एम. रुग्णालय, सायन रुग्णालय, नायर रुग्णालय व कुपर रुग्णालय या चार प्रमुख रुग्णालयांत नवीन सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

सी.सी.टी.व्ही. यंत्रणा नव्याने कार्यान्वित करण्यासाठी सर्वेक्षणाची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु असून डिसेंबर, २०१७ पर्यंत महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालये व प्रसुतीगृहांमध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

सदर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत महानगरपालिकेची १४ रुग्णालये व ६ प्रसुतीगृहांमधील तांत्रिकदृष्टया कालबाह्य झालेली सी.सी.टी.व्ही. यंत्रणा दुरुस्त करुन तात्पुरत्या स्वरुपात कार्यान्वित करण्यात आली आहे.

कर्जत शहरातील भारत संचार निगम लि. (बीएसएनएल) या कार्यालयापासून तलाठी कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाबाबत

(२८) ८६००६ (२३-०८-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत शहरातील भारत संचार निगम लि. (बीएसएनएल) या कार्यालयापासून तलाठी कार्यालयाकडे जाणारा रस्ता कर्जत नगरपरिषदेच्या माध्यमातून सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता बनविण्याचा ठेका ठेकेदाराला दिला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठेकेदाराने मुख्य जलवाहिनीला जोड देऊन जलवाहिनी नगरपरिषदेला न विचारता नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा विभागाच्या कर्मचा-यांच्या संगनमताने रस्त्याचे काम केल्याचे आढळून आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठेकेदाराला बेकायदेशीर जलवाहिनी जोडणी दिल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व तदनुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
जिल्हाधिकारी, रायगड यांनी खालील प्रमाणे कळविले आहे :-
• ठेकेदार यांनी नगरपरिषदेची पूर्व परवागनी न घेता वितरण लाईन वरुन नळ जोडणी घेतली होती.
• सदर बाब नगरपरिषदेच्या निदर्शनास आल्यानंतर नळ जोडणी त्वरीत बंद करण्यात आली आहे.
• सदर प्रकरणी नळ जोडणी नगरपरिषदेच्या संगनमताने झालेली नाही.
(३) सदर प्रकरणी नगरपरिषदेने चौकशी केलेली असून, ठेकेदारांना अदा करण्यात येणाऱ्या देयकामधून दंडात्मक रक्कम वसूल करण्याची तजवीज केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिकेने कल्याण-ठाणे-मुंबई जलवाहतुकीच्या पहिल्या टप्प्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला असल्याबाबत

(२९) ८६०१८ (२३-०८-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेने कल्याण-ठाणे-मुंबई जलवाहतुकीच्या पहिल्या टप्प्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन शासनाकडे माहे एप्रिल,२०१७ च्या तिस-ऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडे पाठविलेल्या अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास, परिसरातील वाहतुकीची समस्या सोडविण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२) ठाणे महानगरपालिकेने शासनास सादर केलेल्या प्रस्तावाचे स्वरुप खालील प्रमाणे आहे :-

- जलवाहतुक प्रकल्पाअंतर्गत प्रथम टप्प्यात रुट क्र.१-"वसई-ठाणे-कल्याण" या जलमार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत असून याबाबत नियुक्त सल्लागाराकडून माहे जानेवारी, २०१८ पर्यंत सदर अहवालाचे काम पुर्ण करणेचे ठाणे महानगरपालिकेचे नियोजन आहे.
- तसेच, टप्पा क्र. २ मधील रुट क्र. २-" ठाणे-मुंबई" व रुट क्र. ३- "ठाणे-नवी मुंबई" या दोन्ही जलमार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकामी सल्लागार नियुक्तीची निवीदा प्रक्रिया सुरू असून माहे मे, २०१८ पर्यंत सल्लागार नियुक्ती व अनुषंगिक कामांसह प्री-फिजिबिलीटी अहवाल इत्यादी कामे पुर्ण करणेचे ठाणे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील महानगरपालिका शाळेतील ३४% मुले कुपोषित आढळल्याबाबत

(३०) ८६४७७ (२३-०८-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महानगरपालिका शाळेतील ३४ % मुले कुपोषित आढळले आहेत अशी माहिती प्रजा फाऊंडेशनने माहे मे, २०१७ वा त्या दरम्यान सादर केलेल्या अहवालात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३-१४ मधील कुपोषित मुलांचा ३०,४६८ चा आकडा वाढून सन २०१५-१६ मध्ये १,३०,६८० इतका झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुलांना पौष्टिक आहार मिळण्याच्या उद्देशाने देण्यात येणारे मध्यान्ह भोजन यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून देण्यात येणारा निधी देखील ८१ टक्क्यावरून ६५ टक्के करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०१७) :(१) बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेतील ३४% मुले कुपोषित असल्याचे माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त केलेल्या माहितीतून मे २०१७ प्रसिध्द केलेल्या अहवालामध्ये दाखविण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) शालेय पोषण आहार ही केंद्र शासन पुरस्कृत योजना असून, सदर योजनेंतर्गत अन्न शिजवून वितरीत करण्याकरिता केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून ६०:४० या प्रमाणात अनुदान मंजूर केले जाते.

सदर योजनेंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सादर करण्यात आलेले सन २०१७-१८ चे वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक शिक्षण संचालक यांचेमार्फत मंजुर करण्यात आले आहे.

सन २०१३-१४ मध्ये शालेय पोषण आहार योजनेंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांमधील इयत्ता १ ली ते ५वी आणि इयत्ता ६ वी ते ८ वी करिता राज्य शासनाकडून एकूण रु. ६१,७०,५२,०००/- इतका निधी तर सन २०१५-१६ मध्ये एकूण रु.७१,१४,९८,७७०/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दिवा (जि.ठाणे) शहरातील नागरीकांना केवळ ४८ लिटर पाणी पुरवठा होत असल्याबाबत

(३१) ८७३४६ (२३-०८-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवा (जि.ठाणे) शहरातील नागरीकांना प्रत्येक माणसी केवळ ४८ लिटर पाणी पुरवठा होत असल्याने रहिवाश्यांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रहिवाश्यांनी पाणीपट्टी भरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दिवा शहराला पुरेसा पाणी पुरवठा करुन रहिवाश्यांची पाणी टंचाई दूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१७) : (१) • दिवा शहराची वाढलेली लोकसंख्या व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून नोव्हेंबर २०१६ पासून पाणी कपात लागू केल्याने त्या काळात काही प्रमाणात पाणी टंचाई होती असे ठाणे महानगपालिकेने कळविले आहे.

• तथापि, सद्यस्थितीत माणसी १२० लिटर पाणी पुरवठा होत असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) नागरिकांनी सन २०१६-१७ मध्ये रु.४.५३ कोटीची पाणी देयके भरली असून रु.१३.०० कोटी थकबाकी आहे.

(३) व (४) • दिवा उपविभागासाठी वाढीव पाणीपुरवठा करण्याबाबत मा.मंत्री (जलसंपदा) यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासमवेत बैठक घेतली.

• त्यानुसार दिवा उपविभागासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून ३१.५० द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

• सद्यस्थितीत २८.०० द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

• तसेच भविष्यात आवश्यकतेनुसार मंजूर कोटयापैकी उर्वरित ३.५० द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून घेण्याचे ठाणे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

तिवसा (जि.अमरावती) येथील नगरपंचायतला नगरउत्थान व दलीत्तेतर योजनेतील प्रास्त निधी खर्चाला मान्यता मिळण्याबाबत

(३२) ८८०३० (२३-०८-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) येथील नगरपंचायतला जिल्हा वार्षिक योजना सन २०१६-१७ अंतर्गत नगरउत्थान व दलीत्तेतर योजनेतील प्रास्त निधी (रुपये ६८ लक्ष) खर्चाला मान्यता मिळण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक ३१ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१७) : (१) स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना प्राप्त झाले आहे.

(२) व (३) तिवसा नगरपंचायत क्षेत्रातील विकास कामांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना सादर केला असल्याचा अहवाल तिवसा नगरपंचायत कार्यालयाने सादर केला असून सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे विचाराधीन आहे.

बेकायदा बांधकामांना सरंक्षण देण्यासाठी शासनाने एमआरटीपी कायद्यात दुरुस्ती करण्यात आल्याबाबत

(३३) ८८५९४ (२३-०८-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अनिल कदम (निफाड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ३१ डिसेंबर २०१५ पर्यंतच्या बेकायदा बांधकामांना सरंक्षण देण्यासाठी शासनाने एमआरटीपी कायद्यात आवश्यक दुरुस्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात अद्याप अंतिम नियम तयार करण्यात न आल्याने या संदर्भातील अंमलबजावणी अद्यापही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंतिम नियम तयार करण्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व त्यासाठी तातडीने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) : (१) होय, या करिता म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ मध्ये कलम ५२ अ समाविष्ठ करणेत आलेले आहे.
(२) नाही, उक्त अधिनियमातील कलम ५२ अे (१) मधील तरतूदीनुसार तयार केलेले नियम अंतिम करुन शासनाने दि.०७/१०/२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे प्रसिध्द केले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

आर्णी (जि.यवतमाळ) येथील आठवडी बाजार लिलाव (हर्रास) न करताही खाजगी लोकांकडून अवैधरित्या वसुली सुरू असल्याबाबत

(३४) ८८६२७ (१८-०८-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्णी (जि.यवतमाळ) येथील आठवडी बाजारात मागील वर्षापासून लिलाव (हर्रास) न करताही खाजगी लोकांकडून अवैधरित्या वसुली सुरू असल्याने यात लाखो रुपयांचा गैरप्रकार झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील आठवडी बाजार हर्रास न झाल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाला असून याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून त्वरित आठवडी बाजार हर्रास करण्यासंदर्भात नगरसेवकांनी मुख्याधिकारी यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार अवैधरित्या वसुली करणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, हर्रास करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१७) : (१) हे खरे नाही.

आर्णी नगरपरिषदेतील सन २०१७-२०१८ करिता आठवडी बाजाराचा वसुली ठेका ई-लिलावाद्वारे हर्रास करण्याकरिता एकच लिलावधारकांने भाग घेतला असल्याने दुसऱ्यांदा ई-लिलावाकरिता जाहिरात देण्यात आली. त्या कालावधीत दि.१.४.२०१७ ते ३०.६.२०१७ पर्यंत नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांमार्फत आठवडी बाजाराची वसूली करण्यात आली. दि. १.७.२०१७ रोजी आठवडी बाजाराच्या वसूलीचा हर्रास घेण्यात आला त्यामध्ये श्री. शेख यूनुस शेख रहीम, आर्णी यांना रितसर कार्यवाही करून ठेका देण्यात आला.
(२) हे खरे आहे.
(३) प्राप्त निवेदने विचारात घेऊन सन २०१७-१८ करीता आठवडी बाजाराच्या वसूलीचा हर्रास घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) सन २०१७-१८ करीता दि. १.७.२०१७ रोजी आठवडी बाजाराच्या वसूलीचा हर्रास घेण्यात आला आहे.

पांढरकवडा नगरपरिषद (जि.यवतमाळ) क्षेत्रातील नव्याने समाविष्ट झालेल्या वसाहतींमधील विद्युत दिव्यांच्या कामाबाबत

(३५) ८८६३६ (२३-०८-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांढरकवडा नगरपरिषद (जि.यवतमाळ) क्षेत्रातील नव्याने समाविष्ट झालेल्या वसाहतींमध्ये नवीन विद्युत दिव्यांचे काम करण्याचे सोडून नगरपरिषदेने जुन्या वस्तीतील चांगल्या सुस्थितीत असलेले विद्युत दिवे काढून त्या जागी आवश्यक नसताना नवीन एल.ई.डी. विद्युत दिवे लावण्याचे ठरवल्याचे माहे मे,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी नवीन विद्युत दिवे लावण्याची कोणतीही आवश्यकता नसताना नवीन विद्युत दिवे लावण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या कामात गैरव्यवहार झाला असून चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१७) :(१), व (२) हे खरे नाही.

पांढरकवडा शहरातील उर्जा बचतीच्या दृष्टीने तसेच शहारातील सौंदर्यवाढ व सरकारचे धोरणाशी सुसंगत नविन तंत्रज्ञानाचा उपयोग होणे व शहरात मुख्य रस्त्यावर नेहमी वर्दळ असल्याने अधिक तेजस्वी पथदिवे लावणे या दृष्टीने नगरपालिका विशेष सभा ठराव क्र. ३, दि. ४.६.२०१६ नुसार शहरात मुख्य रस्त्यावर एल.ए.डी. लावण्याचे काम निविदा प्रक्रिया पूर्ण करून सुरू करण्यात आले आहे. तसेच हद्दवाढ क्षेत्रात पथदिवे लावण्याबाबत निविदा प्रक्रिया पूर्ण करून नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

चांदूर रेल्वे तसेच सातेफळे (जि.अमरावती) येथील हुतात्मा स्मारकांची दुरुस्ती व नुतनीकरण करण्याबाबत

(३६) ८८९०० (२३-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूर रेल्वे (जि.अमरावती) येथील हुतात्मा स्मारक दुरुस्ती व नुतनीकरणाच्या सुधारीत प्रस्ताव शासनास त्वरीत सादर करणे व सातेफळे येथील हुतात्मा स्मारक दुरुस्ती व नुतनीकरण कामाचा परिपूर्ण प्रस्ताव त्वरीत सादर करणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पत्राची गंभीर दखल घेवून त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१७) : (१) हे खरे आहे.

(२) चांदुर रेल्वे नगरपरिषद येथील हुतात्मा स्मारकाच्या दुरूस्ती, देखभाल व नुतनीकरणासाठी रुपये ५०.०० लक्ष एवढया निधीस शासनाची मान्यता देण्यात आहे. त्यानुसार नगरपरिषदेने जिल्हाधिकारी, अमरावती यांना प्रस्ताव सादर केला असून जिल्हाधिकारी यांनी रू.२५,०९,४५०/- इतका निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यानुसार सदर कामाबाबत नगरपरिषदेमार्फत निविदा मागविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर शहरात मंदिर परिसरात अनेक यात्री निवास विना परवाना सुरु असल्याबाबत

(३७) ८९२४८ (२३-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात मंदिर परिसरात अनेक यात्री निवास विना परवाना सुरु असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विना परवाना यात्री निवासाची तपासणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, या विना परवाना यात्री निवासाच्या मालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०४-११-२०१७) :(१) महानगरपालिका हद्दीतील व्यावसायिकांना व्यवसाय परवाना घ्यावा लागतो व त्याचे प्रतीवर्षी माहे एप्रिल मध्ये नुतनीकरण करण्यात येते. या अनुषंगाने महानगरपालिकेने मोहिम राबवून महानगरपालिकेच्या हद्दीतील विनापरवाना यात्री निवासाची तपासणी केली आहे, हे खरे आहे.

(२) व (३) • महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या तपासणीअंती विनापरवाना आढळून आलेल्या ६ यात्री निवासांना सिलबंद करण्यात आले असून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन रु.२३,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोन गावातील (ता.पनवेल,जि.रायगड) ताबा न दिलेल्या घरांचे पैसे गिरणी कामगारांना परत देण्याबाबत

(३८) ८९३९० (०४-०९-२०१७). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोन गावातील (ता.पनवेल,जि.रायगड) ताबा न दिलेल्या घरांचे पैसे गिरणी कामगारांना तातडीने द्यावेत अशी मागणी एमएमआयरडीएने म्हाडाकडे केल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरणी कामगारांचे पैसे तातडीने देऊन त्यांना घरांचा ताबा देण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१६-११-२०१७) : (१) व (२) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचेकडून प्राप्त अहवालानुसार एम.एम.आर.डी.ए.ने दि. १४.०२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दि. ०२.१२.२०१६ रोजीच्या सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या गिरणी कामगारांकडुन जमा करण्यात आलेली सदनिकेची विक्री किंमतीची रक्कम एम.एम.आर.डी.ए. यांचेकडे वर्ग करावी, असे कळविलेले आहे.

तथापि, सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या व कागदपत्रे सादर केलेल्या गिरणी कामगार / वारस यांचेकडुन अद्यापपर्यंत सदनिकेच्या विक्री किंमतीचा भरणा करुन घेण्यात आलेला नसल्यामुळे रक्कम एम.एम.आर.डी.ए.कडे वर्ग करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. भविष्यात पात्र ठरणाऱ्या गिरणी कामगार / वारस यांचेकडून सदनिकेची विक्री किंमत रु. ६ लाखाचा भरणा केल्यानंतर जमा करण्यात आलेली रक्कम नियमानुसार एम.एम.आर.डी.ए.कडे वर्ग करणे शक्य होईल, असेही मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी महानगरपालिकेतील शाळेत कार्यरत असलेल्या ६५ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना मागील ११ महिन्यांपासून वेतन मिळालेले नसल्याबाबत

(३९) ८९४९८ (२३-०८-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिकेतील शाळेत कार्यरत असलेल्या ६५ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना मागील ११ महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांवर व त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ येवू नये यासाठी त्यांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१७) : (१) व (२) अंशत: खरे आहे.

परभणी शहर महानगरपालिका अंतर्गत ६४ शिक्षक व २ शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत असून त्यांचे माहे, एप्रिल-२०१७ ते ऑक्टोबर,२०१७ पर्यंतचे वेतन थकित आहे.

महानगरपालिकेकडील निधी अभावी संबंधितांचे वेतन अदा करणे शक्य झालेले नाही. संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना त्यांचे माहे एप्रिल-२०१७ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आलेले असून, त्यांचे थकित असलेले उर्वरित वेतन दरमहा टप्याटप्याने देण्यात येणार असल्याचे परभणी शहर महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌वभवत नाही.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये धोकादायक व अतिधोकादायक इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांचे पुनर्वसन करण्याबाबत

(४०) ९००१२ (२३-०८-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये धोकादायक व अतिधोकादायक इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांचे पुनर्वसन न करता सी -१ प्रकारातील ६१ इमारती विकसित करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने दिनांक २१ मे, २०१७ रोजी व सुमारास स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक व अतिधोकादायक इमारतीमध्ये राहणाऱ्या ३६९३ इमारतीमधील रहिवासी बेघर होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या पुनर्वसनाबाबत महागनरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१७) :(१) सन २०१७ मध्ये ठाणे महानगरपालिका हद्दीत पावसाळ्यापूर्वी केलेल्या सर्वेक्षणानुसार एकूण ३६९३ धोकादायक इमारती आढळून आलेल्या असून सदर इमारतींपैकी ६८ इमारती सी-१ (अतिधोकादायक, राहण्या अयोग्य व तात्काळ निष्कासीत करणे प्रवर्गात मोडणाऱ्या) प्रवर्गातील आहेत.

(२) व (३) ठाणे महानगरपालिकेने मोडकळीस आलेल्या इमारतीतील रहिवाशांच्या सुरक्षिततेबाबत शासन निर्णय ०५.११.२०१५ अन्वये कारवाई करण्यात आली.

- अतिधोकादायक व राहण्यास अयोग्य इमारती रिक्त करण्यात येतात. अशा ६८ इमारतींपैकी ५७ इमारती रिक्त करण्यात आल्या आहेत. रिक्त करण्यात आलेल्या ५५ इमारतीपैकी २५ इमारती तोडण्यात आल्या आहेत. उर्वरित ११ इमारतींपैकी ७ इमारती रिक्त करण्यास न्यायालयाची स्थगिती आहे.
- उर्वरित ४ इमारतींपैकी १ इमारतीमध्ये शासकीय कार्यालय आहे. तसेच इतर ३ इमारतींचे विद्‌युत, पाणी कनेक्शन खंडीत करण्यात आलेले आहे.

- ठाणे महानगरपालिकेने धोकादायक इमारतींमधील रहिवाशांना तात्पुरती सोय म्हणुन रेंटल स्किममधील इमारतींमध्ये २६०४ सदनिका भाडेतत्वावर उपलब्ध करुन दिल्या आहेत.
- ठाणे शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये इमारतींच्या पुनर्बांधणी संदर्भात शासनाने दिनांक ०५.०७.२०१७ च्या अधिसूचनेनुसार नागरी पुननिर्माण योजनेची नियमावली समाविष्ट केली आहे. यामध्ये नियमातील तरतुदींच्या अनुषंगाने अधिकृत व अनधिकृत इमारतींचा समावेश करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर शहरात एकात्मता जीवन विकास नगर, कुष्ठ वसाहतीची झालेली दुरवस्था

(४१) ९०१६७ (२३-०८-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात एकात्मता जीवन विकास नगर, कुष्ठ वसाहत येथे सुमारे ६० ते ७० वर्षापासून राहणाऱ्या कुष्ठरोगी यांची घरे मोडकळीस आली असून त्यांच्या घराची दुरवस्था झाल्याने या वसाहतींची सुधारणा करण्याबाबत मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसाहतीच्या सुधारणेसाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१७) : (१) हे खरे आहे.

(२) सदर वसाहतीतील जुनी घरे जीर्ण झाली असल्याने सदर घरे पाडून नविन घरे बांधण्यासाठी JNURM अंतर्गत एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (HSDP) मधून ११३ घरकुले बांधण्याची योजना प्रस्तावित होती. तथापि यास संबंधित कुष्ठ रूग्णांचा विरोध असल्याने योजना रद्द झाली. आता दिनदयाळ अंत्योदय योजना, नागरी उपजीविका अभियान अंतर्गत नागरी बेघरांना निवारा बांधण्यासाठी रू. १.६९ कोटी इतक्या निधीस राज्यस्तरीय छाननी समिती कडून मान्यता मिळाली आहे. तथापि, लाभार्थी रूग्ण हे कुटूंबाशिवाय राहण्यास तयार नसल्याने त्यांच्या मागणीनुसार योजनेचा सुधारित प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सहाय्यक अनुदानात वाढ करुन मिळण्याबाबत

(४२) ९०९९६ (२३-०८-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेने स्थानिक संस्था करात (L.B.T.) सूट दिल्यामुळे शासनाकडून मिळणाऱ्या सहाय्यक अनुदानात वाढ करुन मिळण्याची मागणी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-११-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१५ पासून रु.५० कोटीपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था करातून सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि दिनांक १५ ऑगस्ट २०१६ पासून मद्य व मद्यार्क या वस्तूवर स्थानिक संस्था कर लागू करण्यात आला आहे. स्थानिक संस्था कर बंद करण्यात आल्याने महानगरपालिकांचे होणारे नुकसान भरुन काढण्याकरीता शासनस्तरावरुन अनुदान देण्यात येत होते. दिनांक ०१ जुलै २०१७ पासून वस्तु व सेवा कराची (GST) अंमलबजावणी सुरु झाल्याने त्यानअुषंगाने नुकसान भरपाईची रक्कम देण्यात येत आहे.

बांबवडे (ता.शाहुवाडी,जि.कोल्हापूर) गावात प्रादशिक योजना मार्गदर्शक तत्वांचे पालन न केल्याबाबत

(४३) ९२०९५ (१९-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बांबवडे (ता.शाहुवाडी,जि.कोल्हापूर) हे गाव मुख्य बाजारपेठेचे मोठे गाव असून येथे प्रादेशिक योजना प्रसिद्ध केलेली असून प्रादेशिक योजना मार्गदर्शक तत्वांचे पालन न करता प्रसिद्ध करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,गावाच्या लोकसंखेच्या दृष्टीने प्रादेशिक योजनेमध्ये गावठाणापासून १५०० मीटर परीक्षेत्रामध्ये ग्रामीण संकुलाची वाढ करून रहिवाशी क्षेत्र अनुज्ञेय करणे विकासाच्या व भविष्यातील लोकसंख्या वाढीच्या दृष्टीने आवश्यक ठरणार असून याचा विचार आराखड्यामध्ये केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार नवीन विकास आराखडा मंजूर होण्यापुर्वी यामध्ये गावठाणापासून १५०० मीटर परीक्षेत्रामध्ये रहिवाशी क्षेत्र अनुज्ञेय करण्यासह बांबवडे गाव ग्रोथ सेंटरमधून वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१७) : (१) हे खरे नाही, कोल्हापूर प्रदेशाची प्रारुप प्रादेशिक योजना,महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम १६ (१) नुसार उक्त अधिनियमातील सर्व तरतूदींचे पालन करुन दि. १२/०९/२०१६ रोजीच्या प्रादेशिक नियोजन मंडळांच्या १० व्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे दि.२२/०९/२०१६ ते दि.२८/०९/२०१६ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्याबाबत नागरीकांच्या प्राप्त

सूचना-हरकतीबाबत आवश्यक ती वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन सदर प्रारुप प्रादेशिक योजना प्रादेशिक नियोजन मंडळाने दि. ३०/०३/२०१७ रोजीच्या पत्रान्वये शासनास मान्यतेसाठी सादर केली आहे. प्रादेशिक योजनेमधील मौजे बांववडे हे गाव त्या भागातील मुख्य बाजारपेठ असल्याने त्याचा समावेश ग्रामीण विकास केंद्र म्हणून करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही, उक्त प्रारुप प्रादेशिक योजनेमध्ये सन २०११ च्या जनगणने नुसार १०,००० पेक्षा जास्त लोकसंख्येची गावे ग्रामीण विकास केंद्र म्हणुन निर्देशित करण्याचे धोरण ठरविण्यात आले आहे. मौजे बांववडेची सन २०११ ची लोकसंख्या ३८७० असली तरी त्याचा समावेश ग्रामीण विकास केंद्र म्हणुन करण्यात आल्याचे दिसून येते. या गावामध्ये अस्तित्वातील रहिवास वापराचे क्षेत्र २१.३६ हे. आहे. या केंद्राचा सविस्तर जमीन वापर दर्शविणारा नकाशा तयार करण्यात आला असून त्याकरिता ८० व्यक्ती प्रती हेक्टर घनता व सन २०३६ ची प्रक्षेपीत लोकसंख्या ४०७० विचारात घेऊन ३४.७५ हे. क्षेत्र रहिवास वापराकरीता प्रस्तावित केल्याचे दिसून येते.

(३) व (४) कोल्हापूर प्रदेश प्रसिध्द प्रारुप प्रादेशिक योजनेवर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा अहवाल दि. १२/१०/२०१७ रोजी शासनास प्राप्त झालेला असून सद्यस्थितीत सदर प्रादेशिक योजनेची शासन स्तरावर छाननी सुरु आहे. अद्यापही कोल्हापूर प्रादेशिक योजनेस शासनाने अंतिम मान्यता दिलेली नाही.

राज्यातील महानगरपालिकेतील भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी वगळता इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांची बदली इतर महानगरपालिकेत करण्याबाबत

(४४) ९२१९६ (२३-०८-२०१७). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगरपालिकेतील भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी वगळता इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांची बदली इतर महानगरपालिकेत केली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ह्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची बदली इतर महानगरपालिकेत करण्यात येत नसल्यामुळे त्यांची मक्तेदारी वाढली असून त्याचा कामावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील महानगरपालिकेतील अधिकारी कर्मचाऱ्यांची बदली राज्यातील इतर महानगरपालिकेत करण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) : (१) होय.

(२), (३) व (४) राज्यातील महानगरपालिकांतील कर्मचारी/अधिकारी यांची संबंधित महानगरपालिकांच्या आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमांनुसार त्या महानगरपालिकांमध्ये कर्मचारी/ अधिकारी वृंदाची भरती केली जाते. महानगरपालिकांमध्ये केल्या जाणाऱ्या नियुक्त्या

ह्या त्या महानगरपालिकांपुरत्याच मर्यादित असल्याने, सदर कर्मचारी त्या महानगरपालिकांमध्येच कार्यरत राहून सेवानिवृत्त होतात ही वस्तुस्थिती आहे. तथापि, महानगरपालिकांतील अधिकारी / कर्मचारी यांची अन्य महानगरपालिकांमध्ये समकक्ष पदावर बदली करण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात योग्य ती सुधारणा करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

ठाणे महानगरपालिकेने धोकादायक इमारती कोसळून होणा-या दुर्घटना टाळण्यासाठी ३० वर्षे वयोमान झालेल्या इमारतींच्या स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबत

(४५) ९२२५९ (२३-०८-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेने धोकादायक इमारती कोसळून होणा-या दुर्घटना टाळण्यासाठी ३० वर्षे वयोमान झालेल्या इमारतींच्या स्ट्रक्चरल ऑडिटची सक्ती केली आहे मात्र पालिकेनेच नेमलेल्या पॅनलमधील तीन वेगळया स्ट्रक्चरल ऑडिटर्सनी एकाच इमारतीचे तीन वेळा अहवाल दिले असल्याची धक्कादायक माहिती माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारत धोकादायक असून तातडीने पाडावी, इमारत दुरुस्तीयोग्य आहे, दुरुस्तीअंती तीन ते चार वर्षे इमारतीला धोका नाही असे हे अहवाल आहेत त्यामुळे ऑडिटबाबत संशय व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार संबंधित ऑडीटर्सवर काय कारवाई करण्यात आली व इमारतींबाबत योग्य अहवाल देण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०१७) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही.

तथापि, सन २०१५-१६ मध्ये धोकादायक व अतिधोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारती संबंधी मार्गदर्शन सूचनेप्रमाणे धोकादायक इमारतीच्या सुरक्षेबाबत तांत्रिक सल्लागार यांचे दुमत झाल्यास VJTI/IIT मार्फत अहवाल घेण्याबाबत सूचना आहे. त्यानुसार सदर प्रकरणी VJTI/IIT मार्फत तांत्रिक अहवाल प्राप्त होणेकरीता संबंधित गृह निर्माण संस्थेस दिनांक १४.०६.२०१७ रोजी पत्र देण्यात आले असून अद्याप अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

याबाबत VJTI / IIT चा अहवाल २ महिन्यात प्राप्त करुन तद्नुषंगाने निर्णय घेण्याच्या सूचना ठाणे महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

पंढरपूर (जि.सोलापूर) शहर विकास आराखडयाच्या अंतर्गत सुरु असणा-या रस्त्यांच्या कामाबाबत

(४६) ९३३२६ (२३-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) शहर विकास आराखडयाच्या अंतर्गत सुरु असणा-या रस्त्यांच्या कामात प्रशासकीय अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे विकास कामे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या रस्त्यांची कामे त्वरित व चांगल्या पध्दतीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) व (३) पंढरपूर शहर विकास आराखडयाच्या अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ३ रस्त्यांचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याचे प्रस्तावित असून २ रस्त्यांची कामे सुरु असून खडीकरणासह डांबरीकरणापर्यंत कामे पूर्ण करण्यात आली आहेत. त्यावर BM व कार्पेट करणे इ. कामे करण्यात येत आहेत. याशिवाय राज्यस्तर नगरोत्थान योजने अंतर्गत नगरपरिषदेमार्फत एकूण ८ रस्त्यांची कामे सुरू करण्यात आली आहेत. तथापि, राष्ट्रीय हरीत लवादाच्या आदेशांमुळे सोलापूर जिल्हयातील वाळूचा उपसा बंद असून वाळूचा साठा नसल्याने कॉंक्रीटचे काम बंद होते. तथापि, आता वाळूच्या उपलब्धतेनुसार कामे सुरु ठेवण्यात आली आहेत.

पंढरपूर शहरामध्ये (जि.सोलापूर) सुमारे १०० हून अधिक जुन्या इमारती धोकादायक असल्याबाबत

(४७) ९३३५९ (२३-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर शहरामध्ये (जि.सोलापूर) सुमारे १०० हून अधिक जुन्या इमारती धोकादायक असल्याचे माहे मे, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतांनाही भाविक या इमारतींमध्ये वास्तव्य करीत असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संभाव्य दुघटना टाळण्यासाठी इमारतीधारकांनी इमारती दुरुस्त कराव्यात यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१७) : (१) व (२) हे खरे आहे.

पंढरपूर हे पुरातन शहर असल्यामुळे शहरात बऱ्याच जुन्या इमारती आहेत. अशा इमारतींना दरवर्षी आषाढी यात्रेपूर्वी धोकादायक व पडाऊ इमारती काढून टाकण्याबाबत महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९५ (१) नुसार नोटीसा देण्यात येतात. भाविकांनी या इमारतीत राहू नये, असे निर्देशही दिले जातात.

(३) पंढरपूर शहरातील एकूण १०७ धोकादायक इमारतींना नोटीसा बजावण्यात आल्या असून धोकादायक इमारती संदर्भात दै. संचार दि. ३१.५.२०१७ रोजी जाहीर प्रकटन करण्यात आले आहे. तसेच यात्रा कालावधीपूर्वी मंदीर परिसर व प्रदक्षिणा मार्गावरील अत्यंत धोकादायक असलेल्या इमारतींचा धोकादायक भाग नगरपरिषदेमार्फत उतरवून घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

दारव्हा नगरपरिषदेचा नागरी घनकचरा प्रकल्प मागील १२ वर्षांपासून प्रत्यक्षात कार्यान्वित नसल्याबाबत

(४८) ९३६९१ (२३-०८-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारव्हा नगरपरिषदेचा नागरी घनकचरा प्रकल्प मागील १२ वर्षांपासून प्रत्यक्षात कार्यान्वित नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता नसल्याने नगरपरिषदेने तहसीलदार, दारव्हा यांच्या कार्यालयाकडे रस्त्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरी घनकचरा प्रकल्प पुन्हा सुरु करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली तसेच नागरी घनकचरा प्रकल्प बंद पडल्याप्रकरणी संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१७) :(१) हे अंशत: खरे आहे,

दारव्हा नगरपरिषदेने सन २०१०-११ मध्ये कचऱ्यापासून खत निर्मितीचा प्रकल्प १२ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून उभारलेला आहे. सदर प्रकल्प कंत्राटी तत्वावर सुरू करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि, निविदाधारकांनी निविदा दाखल केल्या नसल्याने प्रकल्प कार्यान्वित करता आला नाही.

(२) प्रकल्प उभारण्यात आला त्यावेळी ये-जा करण्यासाठी शेतातून रस्ता होता. तथापि, सन २०१२-१३ मध्ये संबंधित शेतकऱ्याने सदर रस्ता बंद केल्यामुळे वन विभागाच्या जागेतून रस्ता मिळण्यासाठी तहसीलदार, दारव्हा यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे.

(३) संबंधित शेतकऱ्याने जाण्या- येण्याचा रस्ता बंद करून सदर प्रकल्प हटविण्यासाठी न्यायालयात दावा दाखल केला आहे. न्यायालयाचा निर्णय अद्याप प्रलंबित असून प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद जिल्हयात ५०० पेक्षा अधिक अनधिकृत मोबाईल टॉवर उभारण्यात आल्याबाबत

(४९) ९४०२८ (२३-०८-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात ५०० पेक्षा अधिक अनधिकृत मोबाईल टॉवर उभे असून या टॉवरविरोधात महानगरपालिकेने कोणतीही कारवाई केली नसल्याचे माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिकेने मोबाईल कंपन्यांकडून तब्बल १४ कोटी रुपयांचा महसूल वसूल करणे आवश्यक असताना या कंपन्यांनी महानगरपालिकेची कोणती परवानगी न घेता मोबाईल हँडसेट विक्रीची विविध ठिकाणी कोटयवधी रुपयांचे डिजिटल होर्डिंग लावण्यात आल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील मोबाईल कंपन्यांवर तसेच कंपन्याकडून करोडो रुपयांचा महसूल वसूल न करणा-या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१७) : (१) अंशत: खरे आहे.

औरंगाबाद शहरातील एकूण ४०९ मोबाईल टॉवर्सपैकी ८६ टॉवर्सना नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले असून उर्वरित ३२३ टॉवर्स अनधिकृत आहेत.

अनधिकृत टॉवर्सवर औरंगाबाद महानगरपालिकेकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने काही मोबाईल कंपन्यानी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केलेली असून मा.उच्च न्यायालयाने मोबाईल टॉवर्स संदर्भात कोणतीही कठोर कारवाई न करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सदर प्रकरण हे न्यायप्रविष्ठ आहे.

(२) महानगरपालिका हद्दीत विनापरवानगी लावलेल्या विविध मोबाईल कंपन्यांचे डिजिटल होल्डिंग विरुध्द औरंगाबाद महानगरपालिकेने पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच संबंधित कंपनीकडून ५ पट दंडासहित जाहिरात कर वसूल केलेला आहे. शहरात विविध ठिकाणी लावण्यात आलेल्या मोबाईल कंपनीच्या जाहिरातीबाबत संबंधितांकडून जाहिरात कराचा भरणा करुन घेतलेला असल्याचे आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत

(५०) ९४९१७ (२३-०८-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय कर्मचारी व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसाठी सुधारित सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना शासन निर्णय दिनांक १ एप्रिल, २०१० व दिनांक ५ जुलै, २०१० अन्वये सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्याची बाब शासनस्तरावर तपासण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना केव्हापासून लागू करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१२-२०१७) : (१) होय.

(२) नगरपरिषद कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबतचा शासन निर्णय, दि.२७.०९.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.